N.C.R.B (एन.सी.आर.बी.)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बुलढाणा **P.S.(ठाणे):** बुलढाणा शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 1012 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**07/11/2025 23:45

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 07/11/2025

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 07/11/2025

**Time From (वेळेपासून):** 16:17 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:25 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 07/11/2025 **Time (वेळ):** 23:32 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 073

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/11/2025 23:32 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय परीसर ,बुलडाणा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

पोलीस स्टेशन बुलढाणा शहर जि.बुलढाणा

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रमेश दत्तु पवार
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाप्रवि बुलढाणा ,बुलढाणा ,बुलढाणा शहर,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाप्रवि बुलढाणा ,बुलढाणा ,बुलढाणा शहर,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9689009181

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजेंद्र रघुनाथ वास्कर | | | 1. दाभा ता मोताळा ,मोताळा , बुलढाणा शहर,बुलढाणा,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

कायमी अप नं ---- 1012/2025 कलम 7 भ. प्र. अधिनियम 1988
फीर्यादि ---- रमेश दत्तु पवार, वय 37 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. बुलढाणा मोबा 9689009181
आरोपी ---- राजेंद्र रघुनाथ वास्कर, वय 50 वर्षे, पद ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक), वर्ग 3, ग्रामपंचायत दाभा ता.मोताळा जि.बुलढाणा
घटनास्थळ ---- तहसिल कार्यालय परीसर , बुलडाणा
घतावेळ ---- दिनांक 07/11/2025 चे 16.17 ते 16.25 वाजता
दाखल अधीकारी --- पोहेकाँ. दत्तात्रय नागरे ब न 359 पो स्टे बुलडाणा शहर
तपास अधीकारी --- पोलीस निरीक्षक, रमेश दत्तु पवार, वय 37 वर्षे, व्यवसाय नोकरी, ला.प्र.वि. बुलढाणा
फिर्याद लाच लुचपत प्रतिंबधक विभाग बुलडाणा कॅम्प पोलीस स्टेशन बुलडाणा शहर दिनांक 07/11/2025

मी रमेश दत्तु पवार, वय 37 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. बुलढाणा सरकारतर्फे फिर्याद देतो की, दिनांक 06.11.2025 रोजी श्री.साहेबराव प्रताप राठोड, वय 53 वर्षे, व्यवसाय-शेत मजुरी, रा. नाईकनगर, पोस्ट रोहीनखेड ता.मोताळा जि.बुलढाणा यांनी त्यांचे भाचे नामे श्री.ज्ञानेश्वर नामदेव जाधव रा. नाईकनगर यांचेसोबत ला.प्र.वि.कार्यालय बुलढाणा येथे समक्ष हजर येवून तक्रार नोंदविली की, मला दोन मुले नामे संदेश राठोड व उमेश राठोड असे असुन दोन्ही मुले ऊसतोड मजुरीचे काम करतात. माझे व माझा मयत भाऊ सिताराम राठोड यांचे नावे ग्रामपंचायत दाभा ता.मोताळा अंतर्गत नाईकनगर येथे 1050 स्क्वे.फुट जागेवर टिनपत्राचे घर आहे. तसेच गावातील दुस-या ठिकाणी माझी मयत बहीन पार्वताबाई पवार हिचे नावे 600 स्क्वे.फुट खाली जागा आहे. माझा भाऊ सिताराम राठोड व बहीन पार्वताबाई पवार दोन्हीही मयत झालेले असुन त्यांचे वारसदार म्हणुन मीच त्यांचे पालनपोषण करत होतो. वरील दोन्ही जागा सध्या मी वापरत आहे. माझे कुटुंब मोठे असल्याने वर नमुद 1050 स्क्वे.फुट या जागेमधून अर्धी जागा माझा मोठा मुलगा संदेश राठोड यांच्या नावे व दुसरी रिकामी असलेली 600 स्क्वे.फुट जागा हि लहान मुलगा उमेश राठोड यांचे नावे करुन गाव नमुना 8-अ उतारावर नोंद घेण्यासंबधाने मी दि.03.11.2025 रोजी ग्रामपंचायत कार्यालय दाभा येथील ग्रामसेवक श्री.वास्कर साहेब यांना भेटलो असता, त्यांनी वर नमूद दोन्ही जागेचे माझे दोन्ही मुलाच्या नावे करुन गाव नमुना 8-अ वर नोंद करुन उतारा देण्यासाठी 28,000/- रूपये लाचेची मागणी करीत आहेत. अशा तक्रारीवरुन पडताळणी व सापळा कार्यवाहीकरीता मा.कार्यकारी अभियंता, महावितरण संचालन व सुव्यवस्था विभाग बुलढाणा यांना पत्र देवुन दोन शासकीय कर्मचारी पंच म्हणुन उपलब्ध करुन घेतले. त्यानंतर तक्रारदार श्री.साहेबराव राठोड यांनी सांगीतले की, ग्रामसेवक श्री.वास्कर हे बाहेरगावी गेले असल्याने त्यांची लाच मागणी पडताळणी दिनांक 07.11.2025 रोजी करण्यात यावी. अशी विनंती केल्यावरुन सविस्तर पडताळणी पुर्व पंचनामा करुन दि. 07.11.2025 रोजी पडताळणी कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरविण्यात आले.

तक्रारदार श्री.साहेबराव राठोड यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि.07.11.2025 चे 13.34 वा ते 14.10 वा. दरम्यान लोकसेवक ग्रामसेवक श्री.वास्कर, ग्रामपंचायत दाभा ता.मोताळा जि.युलढाणा यांची बुलढाणा ते मोताळा रोडवरील खडकी फाटा येथे पडताळणी कारवाई आयोजीत केली असता लोकसेवक श्री.वास्कर यांनी तक्रारदार श्री. साहेबराव राठोड यांना 'त्याचा विस हजार रुपये खर्च दया, आणि याचा आठ हजार खर्च होईन' असे म्हटले. त्यावर तक्रारदार श्री.साहेबराव राठोड यांनी, 'काही थोडंफार कमी करा साहेब'असे म्हटले असता त्यावर लोकसेवक श्री. वास्कर म्हणाले की, 'हि शंभर टक्के रिक्स हे, म्हणजे तसं रिक्स नसतं तर मी आठ ते दहा हजार रुपयात करुन दिलं असतं' त्यावर तक्रारदार यांनी पुन्हा 'याच्यात काहीतरी कमी जास्त करा' असे म्हटले असता लोकसेवक वास्कर यांनी 'दोन-तिन हजार कमी दया'असे म्हटले त्यावर तक्रारदार म्हणाले की, 'किती दयावं लागण मग'त्यावर

लोकसेवक श्री.वास्कर यांनी 'याच्यात कमीत कमी बावीस ते तेविस हजार रुपये खर्च येईल दोन्हीचे' असे म्हटले. त्यानंतर तक्रारदार यांनी पुन्हा किती दयावे लागतील असे विचारले असता लोकसेवक श्री.वास्कर यांनी, 'विस च्या खाली होणार नाही,' विस तरी दयावच लागणं, असे म्हटले. त्यानंतर तक्रारदार यांनी, मी पैशाची व्यवस्था करुन भेटतो असे सांगीतले. त्यावर लोकसेवक ग्रामसेवक श्री.वास्कर यांनी होकार दिला. यावरुन आयोजीत पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक ग्रामसेवक श्री.वास्कर यांनी तक्रारदार श्री.साहेबराव राठोड यांना त्यांचे मयत भाऊ व मयत बहिनीचे नावे असलेल्या दोन्ही जागेची दोन्ही मुलांच्या नावे नोंद करुन गाव नमुना 8-अ वर नोंदी घेवुन 8-अ उतारा देण्यासाठी तडजोडीअंती 20,000/- रुपये लाच रकमेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्यास संमती दर्शविल्याने सदर प्रकरणात पुढील सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. आयोजीत पडताळणी कार्यवाहीचा सविस्तर पडताळणी पंचनामा तयार करण्यात आला.

त्यानंतर लाप्रवि कार्यालय बुलढाणा येथे तक्रारदार श्री.साहेबराव राठोड यांनी हजर केलेल्या भारतीय चलनातील 500/- रुपये दराच्या 20 नोटा असे 10,000/- रुपये हजर करुन उर्वरीत 10,000/- रुपयांची व्यवस्था करणेबाबत सांगीतले. त्यावरुन 500/- रुपयेच्या नोटेसारख्या दिसणा-या खेळण्यातील भारतीय बच्चो का बँक असे लिहीलेल्या 20 नोटा किंमती 00/- रूपये उपलब्ध करुन घेतल्या. सापळा पथकातील सदस्याचे मदतीने चलनी नोटांचे क्रमांक व वर्णन नोंद करुन घेवून चलणी व खेळण्यातील नोटा एकत्र करुन सदर नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्याची प्रक्रिया पुर्ण केली. त्यानंतर सदर लाच रक्कम तक्रारदार श्री.साहेबराव राठोड यांचे पायजामाचे समोरील उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवून देवून तक्रारदार व पंचाना सापळा कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना देवुन त्याबाबत सविस्तर सापळा पुर्व पंचनामा तयार केला.

त्यानंतर तक्रारदार श्री.साहेबराव राठोड यांचे सांगण्यावरुन त्यांचे भाचे श्री.ज्ञानेश्वर नामदेव जाधव यांनी लोकसेवक श्री.वास्कर यांचे मोबाईल फोनवर संपर्क करुन तक्रारदार श्री.साहेबराव राठोड यांनी पैशाची व्यवस्था केली असुन पैसे कुठे घेवुन यायचे याबाबत विचारणा केली असता लोकसेवक श्री.वास्कर यांनी तहसिल कार्यालय बुलढाणा चे आवारात येण्याचे सांगीतल्यावरुन सदर ठिकाणी सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार श्री.साहेबराव राठोड यांच्याकडे पोकाॅ व्यवहारे यांचे हस्ते व्हाॅईस रेकाॅर्डर सुरु करुन पंच क्र.1 श्री.राऊत व तक्रारदार यांचा भाचा श्री.ज्ञानेश्वर जाधव यांचेसोबत तहसिल कार्यालय बुलढाणा चे आवारात रवाना केले. तसेच त्यांचे मागो-माग आम्ही व सापळा पथक असे शासकीय व खाजगी मोटार सायकलने रवाना झालो. तहसिल कार्यालय बुलढाणा येथे 16.17 ते 16.25 वा दरम्यान आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार श्री.साहेबराव राठोड यांनी पंच क्र.1 यांचेसोबत लोकसेवक श्री.वास्कर यांची भेट घेवुन बोलणी केली. सदर बोलणी दरम्यान तक्रारदार श्री.साहेबराव राठोड यांनी लोकसेवक श्री.वास्कर यांना, 'बरं मग पैसे देवुन टाकु आता' असे म्हणुन त्यांचे पायजामाचे समोरील उजव्या बाजुचे खिशातुन उजव्या हाताने लाच रक्कम लोकसेवक श्री.वास्कर यांचे समोर धरुन म्हणाले की, हा हा, त्यावर लोकसेवक श्री.वास्कर यांनी तक्रारदार यांना, 'किती आहेत' असे विचारुन उजव्या हाताने लाच रक्कम स्विकारली. तेव्हा तक्रारदार यांनी 'विस हजार' असे म्हटल्यावर लोकसेवक श्री.वास्कर यांनी त्यांचे उजव्या हातातील लाच रक्कम त्यांचे नेसत्या पॅन्टचे समोरील उजव्या बाजुचे समोरील खिशात ठेवुन दिली. त्यानंतर तक्रारदार श्री.साहेबराव राठोड यांनी लोकसेवक यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित
शारा करताच लोकसेवक श्री.वास्कर यांना ताब्यात घेवुन त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. राजेंद्र रघुनाथ वास्कर, वय 50 वर्षे, पद ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक), वर्ग 3, ग्रामपंचायत दाभा ता.मोताळा जि.बुलढाणा, रा.जिजाऊ काॅलनी, हाजी मलंग दर्गाच्या पाठीमागे, ता.जि.बुलढाणा असे सांगीतले. त्यानंतर आयोजीत सापळा कार्यवाहीचा सविस्तर सापळा पंचनामा तयार केला.

तरी आलोसे श्री.राजेंद्र रघुनाथ वास्कर, वय 50 वर्षे, पद ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक), वर्ग 3, ग्रामपंचायत दाभा ता.मोताळा जि.बुलढाणा यांनी तक्रारदार श्री.साहेबराव राठोड यांना त्यांचे मयत भाऊ व मयत बहिनीचे नावे असलेल्या दोन्ही जागेची दोन्ही मुलांच्या नावे नोंद करुन गाव नमुना 8-अ वर नोंदी घेवुन 8-अ उतारा देण्यासाठी तडजोडीअंती 20,000/- रुपये लाच रकमेची मागणी करून दिनांक 07.11.2025 चे 16.17 ते 16.25 वा. चे दरम्यान तहसिल कार्यालय बुलढाणा चे आवारात आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांचेकडुन गैरमार्गाने लाच रक्कम स्विकारुन आर्थिक गैरलाभ करुन घेतला. सदर आरोपी लोकसेवक यांचे हे कृत्य कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये गुन्हा होत असल्याने त्यांचेविरुध्द माझी सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

पोलीस स्टेशन बुलढाणा शहर जि.बुलढाणा

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Ravi Uday Rathod(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

ठाणे अंमलदार

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Ravi Uday Rathod
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI